## <u>नियमित दिवाणी दावा क्र. ८२/२००६ मधील निशाणी क्र. १३९ कडील अर्जावर आदेश</u>

१) प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१अ ते १इ यांच्यातर्फे कैफीयत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन कैफीयत दाखल करण्यास परवानगी मिळण्याबाबत दाखल केला आहे.

२) प्रस्तुत अर्जावर वादींतर्फे दिलेल्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, किती दिवसांचा उशीर झाला आहे याचा व कोणती कागदपत्रे उपलब्ध झाली नव्हती याचा उल्लेख केला नाही व त्यामुळे अर्ज रद्द करण्यात यावा.

३) प्रस्तुत अर्जाच्या कामी प्रतिवादी क्र. १अ ते १इ यांच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत अर्जाच्या युक्तीवादाकामी वादींच्या विद्वान वकीलांना दुपारी ४.०० वाजता वारंवार पुकारले असता गैरहजर असल्याने प्रस्तुत अर्जावर वादींतर्फे युक्तीवाद नाही असा आदेश पारीत केला आहे. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

४) रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. १अ ते १इ यांना लेखी कैफीयत दाखल करण्यास विलंब झाला आहे. दाव्याचे स्वरुप व अर्जातील नमुद कारण विचारात घेता माझ्या मते प्रतिवादी क्र. १अ ते १इ यांना या कामी त्यांची लेखी कैफियत दाखल करण्याची संधी देऊन प्रस्तुतचा दावा गुणवत्तेच्या आधारे निकाली काढणे न्यायाचे व उचित आहे. अर्जातील नमुद कारण विचारात घेता माझ्या मते न्यायाच्या दृष्टीने प्रस्तुतचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## <u>आ दे श</u>

१) प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येतो व त्यानुसार प्रतिवादी क्र.

१अ ते १इ यांना लेखी कैफीयत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन लेखी कैफीयत दाखल करण्यास परवानगी देण्यात येते.

२) वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2025.01.28 13:05:09 +0530

(पां. लिं. घुले)

दिनांक– २७/०१/२०२५ २रे सह दि. न्या. व. स्तर, कराड.